# विस्थापीत कुटूंबातील महिलांच्या समस्या व सक्षमिकरणाची स्थिती : माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या संदर्भातील एक अभ्यास

**दिपक आटे**
*सहाय्यक प्राध्यापक, महात्मा फुले समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ*
*संशोधक अभ्यासक, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर*
*deepakate71@gmail.com*

**गोषवारा (Abstract)**
*मानवी जीवनामध्ये पाण्याला फार महत्व आहे. शेती, उद्योग व दैनंदिन जीवनात पाण्याची गरज भासते. वाढत्या लोकसंख्येबरोबर ही गरज भागविण्यासाठी नदीच्या प्रवाहातील वाहून जाणारे अतिरिक्त पाणी साठवून ठेवण्यासाठी धरणे बांधली जातात. ज्याचा वापर जलविद्युत निर्मीती व शेतीकरिता जलसिंचन, पिण्याचे पाण्याचा पुरवठा याकरिता केला जातो. आजच्या परिस्थितीत धरणे पर्यटक स्थळ म्हणूनही उदयास आलेली आहेत. परंतु अशी धरणे बांधतांना बऱ्याच कितीतरी कुटूंबाचे किंवा गावाचे स्थलांतर करावे लागते. जेव्हा स्थलांतरणाची प्रक्रिया सुरु असते. तेव्हा कधी-कधी दुहेरी समस्या निर्माण होतात. धरणाचे कार्य खूप जास्त काळापर्यंत प्रलंबीत राहते. त्यामुळे त्याचा फायदा शेतकरी व गावकरी यांना होत नाही. दुसरीकडे धरणामुळे विस्थापीत झालेल्या लोकांचे योग्य पुनर्वसन व नागरी सुविधाची अपूर्तता यामुळे अनेक गंभीर समस्या निर्माण होतात. या सर्व घटकांमध्ये सर्वाधिक प्रभाव महिला वर्गावर पडतो. या संशोधन लेखामध्ये संशोधनकर्त्याने विस्थापीत कुटूंबातील महिलांना निर्माण होणाऱ्या समस्या व त्यांचे सक्षमिकरणाच्या वर्तमान स्थितीचा आढावा घेतला आहे. ज्यामध्ये महिलांच्या उपजीविकेच्या, आरोग्याच्या व रोजगाराच्या समस्या प्रामुख्याने दिसून येतात. त्यांचा सामाजिक दर्जा ही खालावल्याचे दिसून येते. सदर अध्ययन कार्य यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा प्रकल्पाअंतर्गत विस्थापीत झालेल्या या गावातील महिलांच्या संदर्भात केलेले आहे.*
***बीजशब्द** : विस्थाप, महिला, कुटूंब, समस्या, सक्षमिकरण*

**विषयाची ओळख :**

भारतासह अनेक देशामध्ये मोठ्या धरणांचे बांधकाम हे एक महत्वाची विकासात्मक धोरण आहे. परंतु यामुळे लाखो लोकांचे विशेषत: नदीकाठावरील ग्रामीण, दुर्गम, दुर्लक्षीत गावांचे विस्थापन झालेले आहे. या विस्थापीतांच्या अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

ज्या ठिकाणी आपले कुटूंब पिढ्यानपिढ्या वास्तव्याला असतात. ज्या मातीत, ज्या वातावरणात आपण लहानाचे मोठे होतो. त्यातील तो जिव्हाळा, स्नेह तेथील वातावरणात आपण लहानाचे मोठे होतो. त्यातील तो जिव्हाळा, स्नेह तेथील वातावरणाशी असलेला लळा सोडून कधीही परत न येण्यासाठी हे सर्व जायचे म्हटलं तर..... हा विचारच एक मानसिक धक्का व नैराश्य निर्माण करणारा असतो. विस्थापीत कुटूंबाचं तसंच असतं. विस्थापन, पुनर्वसन हे शब्द उच्चारायला सोपे वाटतात. परंतु या शब्दाची कृतीशील अंमलबजावणी करतांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. सर्वात महत्वाचे म्हणजे या सर्व बाबी आपल्या मनाविरुद्ध कराव्या लागतात. एकीकडे राष्ट्रहितासाठी, देशाच्या विकासाला चालना देण्यासाठी केलेली तडजोड. दुसरीकडे कुटूंबांची घडी नव्याने बसविण्याची मानसिक दुविधा या दोन्ही बाबी असतात. या सर्वांमध्ये खरी कसरत करावी लागते ती विस्थापीत कुटूंबाला. टाईम्स ऑफ इंडिया (जुलै २००५) मध्ये प्रकाशीत झालेल्या वृत्तानुसार देशातील धरण प्रकल्पामुळे विस्थापीत झालेल्या लोकांच्या यादीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. राज्यात अशाप्रकारे ०७ लाखांहून अधिक लोक बाधीत झाल्याचे सरकारने सांगीतले. एका प्रश्नाला उत्तर देतांना त्यावेळचे जलसंपदा राज्यमंत्री रावललाल जाट यांनी सांगीतले की, महाराष्ट्रातील धरण प्रकल्पामुळे एकूण ७,१३,१३६ लोक विस्थापीत झाले आहेत. आंध्रप्रदेशामध्ये धरण प्रकल्पामुळे ४,६४,६७५ विस्थापीत झाले आहेत. यावरुन महाष्ट्रात विस्थापीत कुटूंबांची संख्या मोठी आहे. संख्या जशी जास्त आहे तशाच समस्याही आहेत.

यवतमाळ जिल्ह्यातील बाभूळगांव तालुक्यातील खडकसावंगा येथे बेंबळा नदीवर बेंबळा प्रकल्प बांधण्यात आलेला आहे. या प्रकल्पाला १९९३ ला मंजूरी मिळाली व प्रकल्पाचे काम १९९४ पासून सुरू झाे आहे. बेंबळा प्रकल्प १३,९६८ हेक्टर क्षेत्रफळावर विस्तारलेला असून अमरावती व यवतमाळ जिल्ह्यातील एकूण २४ गावे विस्थापीत झालेली आहेत. त्यापैकी यवतमाळ जिल्ह्यातील बाभूळगाव तालुक्यातील १६ गावे विस्थापीत झाली आहेत. विस्थापीत गावांना वेळेवर योग्य मोबदला व नागरी सोयीसुविधा उपलब्ध न झाल्याने आजदागायत या विस्थापीत गावांच्या समस्या प्रलंबीत आहेत. भटमार्ग, कोठा व मालापूर या गावांतील विस्थापीत लोकांच्या व कुटूंबांच्या समस्या जास्तकाळापासून

प्रलंबित आहेत. अशा विस्थापीत कुटूंबातील उपजीविकेचा व रोजगाराचा प्रश्न सुटलेला नसतांना या कुटूंबातील महिला सक्षमिकरणाची संकल्पना काय असेल हा मनाला उद्विग्न करणारा प्रश्न आहे.

**उद्देश :**

१) विस्थापीत कुटूंबातील महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेणे.

२) विस्थापीत कुटूंबातील महिला रोजगाराची स्थिती जाणून घेणे.

**अध्ययन क्षेत्र :**

प्रस्तुत अध्ययनाचे क्षेत्र मौजा भटमार्ग, कोठा व मालापूर ता. बाभूळगाव जि. यवतमाळ या गावापूरते मर्यादित आहे.

**अध्ययन पद्धती :**

सदर अध्ययन हे वर्णनात्मक स्वरुपाचे आहे. गैरसंभाव्यता नमुना निवडीच्या सोयीस्कर नमुना निवड पद्धतीने गावाची व एककाची निवड करण्यात आली.

**माहिती विश्लेषण :**

१५ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय ग्रामीण महिला दिवस म्हणून साजरा केला जातो. ग्रामीण्ण महिला खऱ्या अन्नदात्या आहेत. त्यांच्या कार्याची दखल घ्यावी आणि या दिनाचे औचीत्य साधून त्यांना प्रोत्साहित करावे. सर्वांची अन्नधान्याची गरज पूर्ण व्हावी यासाठी शेतीत राबणाऱ्या महिलांच्या श्रमाचा गौरव व्हावा. हा या दिन साजरा करण्यामागील उद्देश आहे. भारताच लोकसंख्या ३८ कोटीच्या जवळपास आहे. भारत हा कृषीप्रधान देश असून भारतात ६,४१,००० गावेग आहेत आणि एकूण लोकसंख्येच्या ६२.२ लोकसंख्या ग्रामीण भागात आहे. संपूर्ण भारताच्या अन्नधान्याचा प्रश्न ग्रामीण जनतेवर अवलंबून आहे. यात ग्रामीण भागातील स्त्रीयांचा फार मोठा सहभाग आहे. परंतु या स्त्रीयांची स्थिती जाणून घेतलयास ग्रामीण भागातील बहुसंख्य स्त्रीया या घरकाम, शेती आणि शेतमजूर म्हणूनच गुंतलेल्या आहेत. ग्रामीण भागात दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्यांची संख्या २२ ते २५ कोटीच्या घरात आहे. या दारिद्र्याची झळ सर्वाधिक कुणाला पोहचत असेल तर ग्रामीण स्त्रीला ग्रामीण भागातील स्त्री आई, बहीण, पत्नी, मुलगी या सगळ्या भूमिका पार पाडतांना अनेक समस्यांना कोणतेही तक्रार न करता तोंड देते. ग्रामीण भागातील लोकसंख्येच्या ८०% महिला आजही शेती आणि शेतीपूरक व्यवसायातून मिळणाऱ्या रोजंदारीवर अवलंबून आहेत. याशिवाय घरकाम, स्वच्छता, स्वयंपाक करणे, पाणी भरणे, घरातील निवासाची कामे, वडीलधाऱ्यांची काळजी घेणे, मुलांचे संगोपन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, पाळीव जनावरांची व्यवस्था ही कामे सुद्धा करावी लागतात. अशा सर्व कामात ग्रामीण स्त्रीया गुरफटून गेलेल्या आहेत. ग्रामीण स्त्रीयांच्या दैनंदिन जीवनातील समस्यांचा पाढा संपत नाही. त्यात विस्थापनामुळे आणखीनच भर पडते.

महिला सक्षमिकरण म्हणजे महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देणे. त्यांना शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक संधी उपलब्ध करुन देणे. यामुळे महिलांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारते. शाश्वत विकास म्हणजे पर्यावरण, सामाजिक न्याय आणि आर्थिक विकास यांचा समतोल साधणे होय. जेव्हा महिलांना सक्षमिकरण मिळते तेव्हा ते शाश्वत विकासाच्या उद्दीष्टामध्ये महत्वाची भूमिका बजावू शकतात.

**ग्रामीण भागातील महिला सक्षमिकरणाची स्थिती**

१) **शिक्षण** –

ग्रामीण भागातील महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अजूनही कमी आहे. विस्थापनामुळे पुनर्वसीत गावांमध्ये प्राथमिक शाळेचा अभाव आहे. दूरच्या शाळेमध्ये मुलींना पाठविण्यास पालक तयार नाहीत. अनेक मुलींना शिक्षण अर्धवट सोडावे लागते.

२) **आरोग्य** –

ग्रामीण भागामध्ये महिलांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा मिळत नाहीत. गरोदरपणात आणि प्रसुतीच्या वेळी योग्य काळजी न घेतल्याने मातामृत्यू दर अजूनही जास्त आहे. पुनर्वसीत गावामध्ये आरोग्य केन्द्र, अंगणवाडी केंद्र अजूनही सुरु केलेले नाही. त्यामुळे विस्थापीत कुटूंबांतील महिलांना आरोग्याच्या सुविधा व मार्गदर्शन मिळत नाही. परिणामी आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

३) महिला आर्थिक सक्षमिकरण योजना राबविल्या जातात. परंतु त्यांची अंमलबजावणी प्रभावी केल्या जात नाही. विस्थापीत कुटूंबांना अनिवार्य नागरी सोयी-सुविधा अजूनही मिळाल्या नाहीत. त्या ठिकाणी सक्षमिकरणाच्या योजनांचा विचार करणे अवघड आहे.

४) ग्रामीण भागातील महिला अजूनही अनेक रूढी आणि परंपरांच्या जोखंडात अडकलेल्या आहेत. त्यांना कुटूंबात आणि समाजात समान वागणूक मिळत नाही. त्यांच्यावर अन्याय होतो. विस्थापीत कुटूंबामध्ये रोजगाराचा अभाव, सुविधांचा अभाव, आर्थिक चणचण टंचाई, मानसिक ताण यामुळे व्यसनाधितेचे प्रमाण वाढत आहे. त्याचा परिणाम कौटूंबिक कलह व महिला अत्याचार यांच्या घटनांवर होतो.

विस्थापीत कुटूंबातील महिलांना अनेक गंभीर आव्हानांना तोंड द्यावे लागते. ज्यात उपजीविकेची

समस्या, सामाजिक दुरावा आणि शोषणाबाबतची असुरक्षितता इत्यादी बाबींचा समावेश होतो. धरणग्रस्त विस्थापीत कुटूंबातील महिलांचे सक्षमिकरण त्यांच्या पुनर्वसनासाठी व कल्याणासाठी महत्वाचे आहे.

**धरणग्रस्त विस्थापीत कुटूंबातील महिलांना भेडसावणाऱ्या समस्या.**

१) **उपजीविकेचा प्रश्न** –

धरण बांधणीमुळे विस्थापन झाल्यामुळे जमीन व उपजीविकेच्या साधनांची कमतरता निर्माण झाली. आर्थिक उत्पन्न कमी झाले. वाढत्या गरजा व उत्पन्न कमी त्यामुळे कुटूंबांचे पालणपोषणाची समस्या निर्माण झाली.

२) **सामाजिक दुरावा** –

विस्थापनामुळे मुळच्या ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाण गेल्यामुळे परस्पर संबंधामध्ये दुरा निर्माण झाला. जवळच्या नातेवाईकांपासून, लोकांच्या भेटीगाठी कमी झाल्या. सामाजिक सहकार्याची भावना कमी झाली.

३) **आरोग्याची समस्या** –

विस्थापीत ठिकाणी नागरी सुविधांची उपलब्धता नसल्याने शुद्धा पिण्याचे पाण्याचा अभाव, विस्थापीत ठिकाणी स्नानगृह व शौचालयाचा अभाव, सांडपाण्याची विल्हेवाटीचा अभाव, पुरेशा सकस अहाराचा अभाव, आरोग्यसेवा देणाऱ्या सुविधांचा अभाव यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

**माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भातील सशक्तीकरण**

**डिजिटल सशक्तीकरण**

स्थलांतरित महिलांना संगणक व मोबाईल साक्षरता दिल्यास त्यांना सरकारी योजना, आरोग्य सेवा, रोजगाराच्या संधींबाबत माहिती सहज मिळू शकते. **Diksha, UMANG, MahaOnline** सारख्या सरकारी ॲप्सचा वापर त्यांना मदत करू शकतो.

**ई–गव्हर्नन्स आणि योजनांची पारदर्शकता**

पाणी, निवारा, रोजगार हमी योजना किंवा महिलांसाठी विशेष योजनांची नोंदणी ऑनलाइन उपलब्ध असल्यास महिलांना दलाल किंवा मध्यस्थांवर अवलंबून राहावे लागणार नाही.

**आरोग्य व शिक्षण क्षेत्रात ICT चा वापर**

- **आरोग्य:** टेलीमेडिसिन व हेल्थ ॲप्सद्वारे ग्रामीण व विस्थापित महिलांना वेळेवर आरोग्य सल्ला मिळू शकतो.
- **शिक्षण:** मुलांच्या शिक्षणासाठी ई–लर्निंग प्लॅटफॉर्मचा वापर करता येतो, ज्यामुळे विस्थापित भागात शैक्षणिक संधी उपलब्ध होतात.

**उपजीविका आणि रोजगार**

ई–कॉमर्स व डिजिटल पेमेंट्समुळे महिला स्वतःची उत्पादने (हस्तकला, कृषी उत्पादनं, दुग्धव्यवसाय) ऑनलाइन विकू शकतात. **Self Help Groups (SHGs)** ना डिजिटल बँकिंग जोडल्यास आर्थिक स्वावलंबन वाढते.

**डेटा कलेक्शन व पॉलिसी मेकिंग**

स्थलांतरित महिलांच्या समस्यांचे सर्वेक्षण, डेटा विश्लेषण आणि GIS मॅपिंगद्वारे सरकार व स्वयंसेवी संस्था योग्य धोरण आखू शकतात.

**निष्कर्ष**

ग्रामीण व विस्थापित महिलांच्या समस्या गुंतागुंतीच्या आणि दीर्घकालीन आहेत. परंपरागत दृष्टीकोनातून सशक्तीकरणासाठी आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रयत्नांची गरज आहे. यासोबतच माहिती तंत्रज्ञानाचा वापर महिलांना अधिक जलद, पारदर्शक आणि थेट संधी उपलब्ध करून देतो. डिजिटल साक्षरता, ई–गव्हर्नन्स, ई–लर्निंग, ई–कॉमर्स आणि पॉलिसी मेकिंगमध्ये ICT चा प्रभावी वापर केल्यास धरणग्रस्त व विस्थापित महिलांचे जीवनमान उन्नत होऊ शकते.

**संदर्भ सूची**


१) भगवानसिंग देवेसिंग गिरासे (२०२० JETIR February) 'ग्रामीण महिलांचे आर्थिक सक्षमिकरण'.

२) भा. की. खडसे (२०००) 'भारतीय समाज आणि सामाजिक समस्या', हिमालया पब्लिशिंग हाऊस, नागपूर.

३) एस. पी. लाखे (जुलै २०२२ –JRD) संशोधनपत्रिका 'आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमिकरण काळाची गरज'.

४) शुभांगी गोटे (२०१३) 'स्त्री परिवर्तनाची आव्हाने', व्हीनस प्रकाशन पुणे.

५) उज्वल वैरागडे, विपुल्लता मुळे (२०१२) 'सामुदायिक विकास व महिला सबलिकरण', विद्या बूक पब्लिशर्स, औरंगाबाद.